पनवेल (प्रतिनिधी) माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात सर्व क्षेत्रात मोठया प्रमाणात बदल होत असून आधुनिकरणाच्या या स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने आधुनिक तंत्रज्ञान, सामुग्री आणि शासकीय योजनांच्या माध्यमातून शेतीचा विकास करावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि.३०) येथे केले.

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगाम २०१४ नियोजन व शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा मार्केट यार्डमधील श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.या कार्यशाळेत प्रगतीशील शेतकरी कमलाकर घरत, आत्माराम हातामोडे, गोविंद पाटील जयश्री शेळके, किसनबुवा ठाकूर, श्री.भिडे, संजीव समेळ, गोटीराम ढवळे यांचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आ.ठाकूर पुढे म्हणाले की, जमीनीचे भाव गगनाला भिडल्याने अनेकजण शेतजमीन विकत आहे. परंतु भावी पिढीचा विचार करून शेतकऱ्यांनी जमिनी न विकता त्याच जमीनीत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भातशेतीसह भाजीपाला किंवा फळ उत्पादन घेतल्यास त्याचा मोठया प्रमाणात आर्थिक फायदा मिळू शकतो. शेतीत समृध्दता आहे त्यामुळे एका शेतकऱ्याने दुसऱ्या शेतकऱ्याला मदत केल्यास त्याचाही मोठया प्रमाणात एकमेकाकांना उपयोग होवू शकतो. शेतीबद्दलची उपयुक्त माहिती शासनाकडून मिळत असते त्याचा फायदा करून प्रगतीशील शेतकरी बनण्याचा प्रयत्न प्रत्येक शेतकऱ्यांनी करणे गरजेचे असून शेतीच्या पर्यायाने देशाच्या विकासासाठी प्रगतीशील शेतकऱ्यांची संख्या वाढणे जरूरी आहे असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगून नैगर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीच्या नुकसानाची भरपाई शेतकऱ्यांना तत्परतेने मिळण्यासाठी कृषि व महसूल विभागाने समन्वय साधून काम केले पाहिजे, असेही यावेळी त्यांनी आवर्जून नमूद केले.

यावेळी जिल्हा कृषि अधिक्षक काशिनाथ तरकसे आणि पनवेल तालुका कृषि अधिकारी देवराम बनकर यांनी आपल्या भाषणातून शेती संदर्भात शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. शेतकऱ्यांना बांधावर खत आणि बियाणे देण्याचा महत्वकांक्षी निर्णय राज्य शासनाने घेतला आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी विभागाकडून केली जात आहे. शेतकऱ्यांना दरवर्षी खताचा मुबलक पुरवठा केला जात असून यंदाही मागणीनुसार पुरवठा केला जाणार असल्याचे बनकर यांनी सांगितले.त्याचबरोबर शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची माहिती मिळवून देण्यासाठी दरवर्षी शेतकऱ्यांसाठी विविध ठिकाणी सहल, प्रदर्शन भरवले जात असल्याचे त्यांनी सांगून विविध प्रकल्पांसाठी सबसिडी दिली जात असल्याचेही सांगितले.

या कार्यशाळेश प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य व तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, कॉंग्रेसच्या कृषी सेलचे सरचिटणीस के.एस.पाटील, पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, माजी पंचायत समिती सदस्य ज्ञानेश्वर बडे, कृषि विभागाचे उपविभागीय अधिकारी संपतराव थोपटे, पर्यवेक्षक एन.वाय घरत, खारभूमी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ.के.डी.पाटील, कृषि अधिकारी शर्मिला जाधव, सहाय्यक अधिकारी एस.डी.खोत, युसूफ मेहरअली सेंटरचे मदन मराठे, काळुंद्रे विभागीय कॉंग्रेसचे अध्यक्ष अनेष ढवळे, योगेस लहाने, तुकाराम पाटील आदींसह शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.